Devrukh Spiritual Prowess Pvt Ltd
Brahmakamal Ashram, Swami Samarth Marg, Devrukh, Ozare (Khurd), Tal. Sangameshwar, Dist. Ratnagiri, Maharashtra – 415804
www.dsppl.in,

॥ श्री स्वामी समर्थ ॥

आपल्या भावी पिढीच्या उज्वल भविष्यासाठी, आमचा खारीचा वाटा ............

**५ ते ८ वयोगटातील मुलांसाठी EduSPOTS केंद्र -**
**"प्रज्ञेचा मार्ग" (Pathway To Wisdom) कार्यक्रमांतर्गत**

स्वामींच्या प्रेरणेतून आणि श्री अजित तेलंग सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व साधक साल २०१२ पासून गेली १२ वर्षे मुलांची तसेच युवकांची निवासी शिबिरे देवरुखच्या स्वामी समर्थ मठामध्ये भरवत आलो आहोत. करोना नंतर साल २०२२ च्या दिवाळी पासून हि शिबिरे आम्ही "अनिवासी" पद्धतीने वेवेगळ्या शहरांमध्ये भरवीत आहोत. आता एप्रिल २०२४ पासून या शिबिरांबरोबरच छोट्या गटासाठी (वय वर्ष ५ ते ८ साठी) आम्ही EduSPOTS संस्कार केंद्रे सुरु करीत आहोत. नवीन शैक्षणिक धोरणातील पुढील परिच्छेद आमच्या EduSPOTS च्या संकल्पनेशी जोडला जाणारा आहे.
The aim of education will not only be cognitive development, but also building character and creating holistic and well-rounded individuals equipped with the key 21st century skills – Point No 4.4 of NEP 2023

या आमच्या EduSPOTS केंद्राविषयी थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे –

## शिबिरांची सुरुवात का झाली ?

श्री अजित तेलंग सर उच्चविद्याविभूषित, कॉर्पोरेट सल्लागार, २ प्रगतिशील अन मोठ्या कंपन्याचे डायरेक्टर, पण २५ वर्षांपूर्वी स्वामींच्या साक्षात्कारातून अध्यात्मिक विषयाकडे वळले, ते कायमचे. तेलंग सर अमेरिकेला २००४ साली गेले असता ८ वर्षाच्या मुलाचा आणि त्याच्या आईचा एक प्रसंग त्यांच्यासमोर घडला, अन लक्षात आले, कि हि पिढी वेगळी आहे, काहीतरी मोठा बदल घडला आहे, जो आपल्याला समजलेला नाही. अन आत्ताच काहीतरी केले नाही, तर भविष्य धोक्याचे आहे. मग सुरु झाला मोठा रिसर्च.

तब्बल ८ वर्षे भारतातील अन अमेरिकेतील वेगवेगळ्या शहरांमधल्या अन वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील १०,५०० हुन अधिक कुटुंबांवर केल्या गेलेल्या रिसर्च मधून सामोरे आलेले निकाल आमच्यासाठी देखील मोठे धक्कादायक होते. अनेक डॉक्टर, न्यूरोलॉजिस्ट, समुपचर तज्ज्ञ, न्यायाधीश, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर पासून ते मोठे कोर्पोरेट, अन अगदी भारतीय सैन्यदलातील अधिकारी यांच्यासमोर तो रिसर्च अन त्यातील निष्कर्ष मांडले. तेंव्हा त्यांनी देखील यातील मुद्यांवर एक मताने सहमती दर्शवली. अन आता खात्री झाली.

आपली पिढी अन आताची पिढी (वर्ष २००० नंतर जन्मलेले) यांमध्ये जनुकीय संरचनेपासून मोठे बदल आहेत, स्वाभाविकच त्याचा परिणाम या पिढीच्या पाचही व्यतिमत्व विशेषणावर - शारीरिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक अन अध्यात्मिक यांवर झाला आहे. ज्यामुळे आधीची पिढी अन हि पिढी यामध्ये २८ ठळक फरक आहेत, ज्याचा आमूलाग्र परिणाम कुटुंबापासून, शाळेपर्यंत अन कोर्पोरेट पासून ते सरकारी कचेऱ्यांपर्यंत दिसू लागला आहे.

येत्या काही वर्षात, आपला भारत देश सर्वात तरुण देश असणार आहे, असे म्हणतात. पण मुद्दा असा आहे कि या तरुणाईला योग्य दिशा मिळाली तर ठीक. अन्यथा, फायद्यापेक्षा तोटाच अधिक संभवतो आहे. वर सांगितलेल्या २८ पैकी - भावनिक अधिरता, मनाची चंचलता, अनियंत्रित कल्पनाशक्ती, अन टोकाची आक्रमकता या चारच वैशिष्टांनी युक्त असा हा तरुण संभ्रमित अन स्वैराचारी झाला, तर उद्याच्या समाजाची कल्पना देखील न केलेली बरी ! त्यासाठी म्हणून मग हा शिबिराचा घाट !

अगदी मनापासून सांगतो. आपल्याला स्मार्ट मुले नको आहेत, स्मार्ट फोन, स्मार्ट टीव्ही इथपर्यंत ठीक आहे. स्मार्ट पण इथेच थांबू देत. आपल्याला ज्ञानी (wise) अन विवेकी मुले हवी आहेत. त्यासाठी "प्रज्ञेचा मार्ग" (Pathway To Wisdom) हा आमचा प्रयत्न.

## "प्रज्ञेचा मार्ग" (Pathway To Wisdom) शिबिरांचा इतिहास -

वर्ष २०१२ पासून देवरुख रत्नागिरी येथे स्वामी समर्थ मठामध्ये निवासी शिबिरांची सुरुवात झाली. ३० मुलांचे एक अशी एकूण २ शिबिरे मे महिन्याच्या सुट्टीत भरवली जाऊ लागली. त्यात मिळणार प्रतिसाद अन मुलांमध्ये झालेला सकारात्मक बदल, ज्यामुळे एकूणच कुटुंबामध्ये निर्माण झालेले आनंद, आम्हा साधकांना अशी शिबिरे भरवण्याची मोठी ऊर्जा देऊ लागला. महाराष्ट्रातून तसेच गुजराथ मधल्या अनेक शहरातून, तसेच बंगलोर, हैदराबाद व अगदी दिल्लीहूनही मोठ्या उत्साहाने पालक मुलांना पाठवू लागले. या अनुभवातून या कार्याकडे पूर्णपणे लक्ष देता यावे, म्हणून मग आम्ही साधकांनी DSPPL संस्थेची निर्मिती केली. प्रत्येक बाबतीत अध्यात्म हे तत्वज्ञान समोर ठेवून "भौतिक गोष्टींमध्ये देखील सेवाभाव सर्वतोपरी असू शकतो" यासाठी मग कॉर्पोरेट कंपनी स्थापन केली. आम्ही सर्व साधक सीए, सी एस, संगणक तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ असून आपापल्या क्षेत्रात परिपूर्ण आहोत. तरी समाजासाठी काहीतरी चांगले करायचे म्हणून निर्माण केलेली हि संस्था !

बघता बघता २०२२ साली या शिबिरांना १० वर्षे पूर्ण झाली. अगदी करोना काळात देखील ऑनलाईन शिबिरे साकार झाली. पण देवरुख मठामध्ये निवासी सोय ३० पेक्षा अधिक मुलांची एका वेळेला करणे कठीण जाते, तसेच पालकांना मुलांना देवरुखला आणावे व सोडावे लागते, त्यांच्या सुट्यांचा प्रश्न, वर परत प्रवास खर्च देखील होतोच. या गोष्टींचा सारासार विचार करून मग दिवाळी २०२२ पासून आम्ही वेगवेगळ्या शहरांमध्ये "अनिवासी" शिबिरे सुरु केली.

## "प्रज्ञेचा मार्ग" (Pathway To Wisdom) कार्यक्रमाचा उद्देश –

"चारित्र्य संपन्न समाज" हे कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आमच्या शिबिरातून शिकलेला मुलगा सदाचारी असावा, ज्ञानी असावा, विवेकी असावा, अन त्याचा त्याच्या कुटुंबालाच नाही तर आजू बाजूच्या समाजाला देखील आधार वाटावा अशी आमची इच्छा ! आजचा निरागस बालक, उद्याचा सक्षम युवक अन नंतरचा विवेकी प्रौढ व्हावा. त्याचा व्यतिमत्व विकास शारीरिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक अन अध्यात्मिक अशा पाचही अंगानी व्हावा, यासाठी आमचा हा प्रयत्न. शैक्षणिक पदवी त्याने कोणतीही घ्यावी - डॉक्टर, सीए, इंजिनियर व अन्य काही. पण या आधी तो एक "चांगला माणूस" बनावा म्हणून आमची हि धडपड.

लहान वयापासूनच शिबिरे व EduSPOTS केंद्र सुरु करण्यासाठी शास्त्रीय कारणे आहेत, आधुनिक विज्ञान सांगते कि वयाच्या ६ व्या वर्षापर्यंत मानवी मेंदूची ८५% वाढ झालेली असते. मनाच्या विकासाची सुरुवात, सूर्य नाडी अधिक सक्षम, तर पिच्युटरी ग्लॅन्ड मुळे संप्रेरकांचा शारीरिक प्रभाव, यासाठी मुलांची

जडण घडण सुरु होतानाच  त्यांना योग्य दिशा देणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी  म्हणून मग या वयात गुरु गृही पाठवायचे. अन गुरु त्यांना "दीक्षा" द्यायचे. दीक्षा शब्दाचा अर्थ - दिक (म्हणजे दिशा) + शा (म्हणजे बुद्धी) असा आहे. तोच आमचा प्रयत्न, म्हणून शिबिरांची व केंद्राची सुरुवात ५ वर्षांपासून. जेणेकरून हे पहिले स्थित्यंतर छानसे घडेल.

## EduSPOTS केंद्रात दैनंदिन काय होणार –

आमचे EduSPOTS केंद्र "TAPASYA" तपस्या हा मूलमंत्र घेऊन कार्य करणार. प्रज्ञेच्या मार्गावरचे पहिले पाऊल म्हणजे EduSPOTS केंद्राची तपस्या !

TAPASYA या इंग्रजी शब्दाच्या प्रत्येक अक्षरापासून तयार होणारी हि मालिका -
T = Thought of the Day - सुविचार
A = Activity
P = Prayer - प्रार्थना
A = Abhyas Katha (Moral Story) - कथा
S = Stotra - स्तोत्र
Y = Yoga - योगासने
A = Abhyas (Home work) - गृहपाठ

अर्थात EduSPOTS केंद्रात मुलं येईल. आल्यावर सर्वप्रथम राष्ट्रगीत होईल. मग एक प्रार्थना म्हटली जाईल. स्तोत्र म्हणले जाईल. त्याला आम्ही एक छानशी गोष्ट सांगू, एक ॲक्टिव्हिटी (गाणे, नाटक, खेळ) असे केले जाईल, त्याला एक सुविचार सांगितला जाईल, काही योगासने करून घेतली जातील, अन एक गृहपाठ देऊन सुट्टी होईल.

एक छानसे पोषक वातावरण तयार करण्याचे काम आमचे हे केंद्र करेल.

## EduSPOTS केंद्रात कोण शिक्षक आहेत ?

EduSPOTS केंद्रात असणारे शिक्षक स्वामी समर्थ देवरुख मठाचे साधक आहेत. व सेवा वृत्तीने हे शिबीर चालवितात. त्यांच्यासाठी हे केंद्र म्हणजे चिमुकल्या  मुलामुलींच्या साथीने त्यांची साधना पुढे नेण्यासाठीचा आणखी एक प्रयोग. त्यामुळे मुलांना काही शिकवण्यापेक्षा प्रेमाचे अन आनंदाचे आदान प्रदान. अन त्याला निमित्त म्हणून मग आपली वर नमूद केलेली "तपस्या"

## EduSPOTS केंद्राचा कालावधी व त्याची फी –

केंद्राचा एकूण खर्च अपेक्षित धरून पुढीलप्रमाणे फी वा तुमच्या पाल्यासाठीची हि गुंतवणूक आहे –

EduSPOTS (Age 5 to 8 years) - 17th April to 16th May 2024 (Sunday Off) – Fee Rs. 500/-